**प्रेसनोट** दिनांक:- १०/०६/२०२१

# ‘‘ घरफोडी करणारा अट्टल आरोपी नवी मुंबई गुन्हे शाखेकडुन जेरबंद’’

-------------------

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील कामोठे पोलीस ठाणे हद्दीमध्ये दि. २२/०५/२०२१ रोजी पहाटे ०५:०० वाजताच्या सुमारास सेक्टर १३, कामोठे येथील आर्ट वॉच व फुड मॅजिक या दोन दुकानाचे शटर उचकटुन दुकानातील घड्याळे व रोख रक्कम चोरून नेल्याने कामोठे पोलीस ठाणे गुर नं. ३००/२०२१, भादवि कलम ४५७, ३८०, प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सध्या कोरोना विषाणुच्या संसर्गामुळे कारागृहामध्ये होणारा संसर्ग टाळण्यासाठी मा. न्यायालयाने जामिनावर मुक्त केलेल्या आरोपींच्या हालचालीवर लक्ष ठेवणेबाबत तसेच त्यांना वेळोवेळी चेक करणेबात मा. पोलीस आयुक्त, श्री. बिपिनकुमार सिंह साो, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. डॉ. बी. जी. शेखर पाटील साो, मा. पोलीस उप आयुक्त ( गुन्हे ), श्री. प्रविण पाटील साो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त ( गुन्हे ), श्री. विनोद चव्हाण साो, यांनी गुन्हे शाखेच्या सर्व शाखांना सूचना दिल्या होत्या.

सदर गुन्हयांच्या समांतर तपासादरम्यान गुन्हे शाखा, कक्ष ०२, पनवेल येथिल वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री गिरीधर गोरे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश कराड, सपोनि प्रविण फडतरे, पोउपनि वैभव रोंगे, पोउपनि मानसिंग पाटील व पथक यांनी सदरचा गुन्हा घडलेल्या ठिकाणी वेळोवेळी भेट देवुन सदर ठिकाणचे तसेच आजुबाजुचे सीसीटिव्ही फुटेज तपासुन सदरचा गुन्हा करणारा आरोपी हा नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अभिलेखावरील तसेच कोरोना विषाणु संसर्ग टाळण्याच्या धर्तीवर मा. न्यायालयाने मुक्त केलेला आरोपी नामे मिथुन मोजलीस सिकद्दर, वय २६ वर्षे, धंदा- भंगार वेचने, रा. मोठा खांदा गाव, पनवेल, मुळ राठी - काशीपुर ज्योतीनगर कॉलणी, ता - बी. बाजार, जिल्हा - दक्षिण २४ परगणा, पं. बंगाल याने केल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीस ताब्यात घेण्याच्या अनुषंगाने वेगवेगळी पथके तयार करून कामोठे, खांदेश्वर, पनवेल, खारघर परिसरामध्ये गुन्हा दाखल झाल्यापासुन सापळा लावुन त्यास खांदेश्वर सर्कस मैदान येथे ताब्यात घेतले. सदर आरोपीकडे सखोल तपास करून त्याचेकडुन गुन्ह्यातील गेलेला संपुर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कोरोना विषाणुचा संसर्ग होत असल्याने कारागृहात होणारा संसर्ग टाळण्यासाठी मा. न्यायालयाने सदर आरोपीस दि. १३/०५/२०२१ रोजी जामिनावर मुक्त करण्यात आले होते. तळोजा कारागृहातुन बाहेर आल्यानंतर नमुद आरोपीने सदरचा गुन्हा केलेला आहे. नमुद आरोपीवर यापुर्वी चोरी व घरफोडीचे एकुण ०७ गुन्हे दाखल आहेत.

सदरच्या गुन्हयाच्या तपासादरम्यान सफौ. एस. पाटील, सफौ एस. सांळुके, पोहवा १७३२/पाटील, पोहवा १३३९/काटकर, पोहवा १३४३/ गडगे, पोहवा ४२०/पवार, पोहवा २७००/कुदळे, पोना २०२२/पाटील, पोना २०८२/कानु, पोना २३३४/मोरे, पोना ४४१३/फुंदे, पोशि १२५९३/पाटील, यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

-----